प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक

# पुढारी

स्थापना १९३९

www.pudhari.com

सातारा | बुधवार । २७ एप्रिल २०२२ । वर्ष ८४ । मुंबई, पुणे, औरंगाबाद, कोल्हापूर, सांगली, सातारा, ठाणे, रायगड, सिंधुदुर्ग, र

डी. पी. भोसले कॉलेज ग्रंथालय कोरेगाव

संक्षिप्त



प्रदर्शनाचे उद्‌घाटन करताना डॉ. विजयसिंह सावंत व इतर.

## डी. पी. भोसले कॉलेजमध्ये ट्रेड फेअर उत्साहात

**सातारा : पुढारी वृत्तसेवा :** कोरेगाव येथील डी. पी. भोसले महाविद्यालयात विद्यार्थ्यांमध्ये व्यवसाय व्यवस्थापन, आर्थिक सक्षमता, मार्केटिंग, ग्राहक संबंध, विक्री-संवाद कौशल्य, डिजिटल पेमेंट जागरुकता व उद्योजकता निर्माण व्हावी, यासाठी ट्रेड फेअर डे उत्साहात पार पडला. 'ट्रेड फेअर डे' चे उद्‌घाटन प्राचार्य डॉ. विजयसिंह सावंत यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी उपप्राचार्य डॉ. एस. डी. जाधव, प्रा. सी. बी. जावळे, प्रा. एस. एन. कोळेकर, डॉ. एस. एस. यादव उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी खाद्यपदार्थांसह विविध वस्तूंचे ३४ स्टॉल लावले होते. यामध्ये महाराष्ट्रीयन, पंजाबी, गुजराती, मालवणी, राजस्थानी आदी विविध प्रांतीय खाद्यपदार्थांसह आईस्क्रीम, विविध शीतपेये, शाकाहारी व मांसाहारी पदार्थ यांचा समावेश होता. या महोत्सवाला विद्यार्थी व नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. ट्रेड फेअरचे आयोजन वाणिज्य विभागप्रमुख प्रा. डी. डी. पाटील, कनिष्ठ वाणिज्य विभागप्रमुख प्रा. बी. एस. गायकवाड व विभागातील सहकारी प्राध्यापक यांनी केले. यावेळी सर्व विभागप्रमुख, प्राध्यापक यांचे सहकार्य लाभले.

२७-०४-२०२२ पुढारी